**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ अंतर्गतच्या (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ नुसार आस्थापनेचा नोंदणी दाखला एक दिवसात देण्यासंदर्भात.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय-एमएसए-०२/२०१९/प्र.क्र. ३४/कामगार-१०**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २८/०२/२०१९.

वाचा :- १) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम,२०१७
२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम,२०१८

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ हे नियम दिनांक २३/०३/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले. सदर नियमातील नियम ५ मध्ये आस्थापनेची नोंदणी करावयाची कार्यपध्दती नमूद केलेली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार नोंदणी दाखला घेण्याकरिता विहित नमुन्यात अर्ज सुविधाकाराच्या डॅशबोर्डवर प्राप्त झालेल्या दिनांकापासून कार्यालयीन कामकाजाच्या सात दिवसांच्या आंत तो मंजूर करुन नोंदणी दाखल्याच्या नमुना- ब मध्ये असलेल्या नोंदणी दाखल्यावर डिजिटल स्वाक्षरी करण्यात येईल, अशी तरतूद आहे. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ च्या कलम ६(२) मध्ये सदर अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीव्दारे सादर करण्याची तरतूद आहे.

शासनाच्या व्यवसाय सुलभीकरण (ईज ऑफ़ डुईंग बिझनेस) धोरणांतर्गत डीआयपीपी औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभाग (डीआयपीपी) यांनी उक्त अधिनियमांतर्गत सुचविण्यात आलेल्या सुधारणांमध्ये उक्त अधिनियमांतर्गत देण्यात येणारा नोंदणी दाखला अर्ज प्राप्त झाल्यानंतर एका दिवसात देण्यात यावा, अशी सूचना केलेली आहे. औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभाग (डीआयपीपी) यांनी सूचित केल्याप्रमाणे उक्त अधिनियमांतर्गत देण्यात येणारा नोंदणी दाखल्याबाबतचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर नोंदणी दाखला एक दिवसात देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ च्या कलम ६(२) अन्वये अर्जदाराने नोंदणी दाखला घेण्याकरिता विहित नमुन्यात परिपूर्ण भरलेला अर्ज व महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम, २०१८ मधील अनुसूचीमध्ये दर्शविलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज ऑनलाईन सादर केल्यानंतर व तो सुविधाकाराच्या डॅशबोर्डवर प्राप्त झालेल्या दिनांकापासून कार्यालयीन कामकाजाच्या एका दिवसात तो मंजूर करुन नोंदणी दाखल्याच्या नमुना- “ब” मध्ये असलेल्या नोंदणी दाखल्यावर डिजिटल स्वाक्षरी करण्यात यावी. सुविधाकाराने आवश्यक ती कागदपत्र व

परिपूर्ण असलेला नोंदणी दाखल्याचा अर्ज एका दिवसात निकाली काढावा. सदर अर्ज ऑनलाईन प्रणालीव्दारे स्वयं-घोषणापत्र व स्वयं साक्षांकित केलेल्या कागदपत्रांच्या आधारे देण्यात यावा. नोंदणी दाखला देण्यापूर्वी निरीक्षण करण्याची तरतूद अधिनियमात नाही. त्यामुळे दुकाने व आस्थापनेचा नोंदणी दाखला देण्यापूर्वी सुविधाकाराने सदर आस्थापनेचे निरीक्षण करण्याची आवश्यकता नाही. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०३०५१६५५१५२५१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

MAHENDRA KALYANKAR

Digitally signed by MAHENDRA KALYANKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=63a1e1974ba057de0816c577e58a37332a1706ebf892276aa7494a9a621d5b74, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=INDUSTRY AND ENERGY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MAHENDRA KALYANKAR
Date: 2019.03.05 16:57:40 +05'30'

**(डॉ. महेंद्र कल्याणकर)**

सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण), महाराष्ट्र-१, मुंबई.

२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा, मुंबई-५१.

५. अवर सचिव, कामगार-९, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

६. निवडनस्ती (कामगार-१०).